पहिले/वर्तमान प्रकाशन: जानेवारी 2022
आवृत्ती: 1
दस्तावेजाचा प्रकार: धोरण
व्याप्ती: जागतिक

# जागतिक लाचलुचपत-विरोधी आणि भ्रष्टाचार-विरोधी धोरण

| |
|---|
| **धोरणाचे नाव** |
| ग्लोबल भ्रष्टाचार-विरोधी धोरण |
| **हेतू** |
| हे धोरण जगभरातीलसंबंधित भ्रष्टाचार-विरोधी कायदे आणि नियमनांच्या अनुपालनाची खात्री करण्यासाठी वर्तमान कार्यप्रणालींवर सर्वसाधारण मार्गदर्शन आणि माहिती पुरविते. |
| **उद्दिष्टे** |
| या धोरणाची उद्दिष्टे आहेत: |
| 1. भ्रष्टाचाराशीलढण्यासाठी कंपनीच्या वर्तमान अंतर्गत पद्धतींबाबत जागरूकता वाढविणे.<br>2. या धोरणाच्या किंवा अन्य संबंधित नियमनाच्या कोणत्याही उल्लंघनास किंवा संभाव्य उल्लंघनास कळविण्यासाठी कंपनीच्या कर्मचाऱ्यांना सक्षम बनवेल अशी स्पष्ट आणि सुसंगत चौकट बनविणे.<br>3. आपण काम करत असलेल्याप्रत्येक देशातील स्थानिक कायद्यांचे पालन करणे. |
| **प्रेक्षक** |
| ॲलॉय टॉप्को लिमिटेडच्या परिचालन नियंत्रणाखाली काम करत असलेल्या सर्व कंपन्यांसह, Doncasters ग्रुपमधील सर्व कंपन्यांसाठी हे धोरण लागू होते. |
| खालील दस्तावेजात Doncasters ग्रुप संस्थेला आलटून पालटून “Doncasters” किंवा “कंपनी’ असे संबोधण्यात आले आहे. |
| Doncasters याची खात्री करण्यासाठी वचनबद्ध आहेत की त्यांचे पुरवठादार आणि सल्लागार यांच्यासह परंतु यांच्यापुरते मर्यादित न राहता, भागधारक या धोरणात नमूद केलेल्या तत्त्वांचे समर्थन करतात आणि त्यांच्या कार्यांमध्ये समान धोरणांचा अवलंब करतात. |
| **या धोरणात सामील केलेले आहे...** |
| 1. व्याख्या<br>2. यथायोग्य परिश्रम आणि जोखीम<br>3. Doncasters लाचलुचपतीच्या बाबींशी कशी लढते?<br>4. अनुपालनासाठी जबाबदारी<br>5. रिपोर्टिंग मेकॅनिजम |
| **गोपनीयतेची स्थिती** |
| सार्वजनिक |

| |
|---|
| **स्थानिक अनुकूलन प्राधिकरण** |
| होय, जर जास्त प्रतिबंधात्मकअसल्यास |
| **दस्तावेजाचे मालक** |
| कायदेशीर, अनुपालन आणि जोखीम |
| **दस्तावेज समीक्षक** |
| कार्यकारी |
| **दस्तावेज मंजुरीकर्ता** |
| संचालक मंडळ |
| **परिचय** |
| ***"व्यवसायाच्या आचरणाची उच्च मानके कायम राखणे याचा अर्थ आपण करत असलेली कृत्ये आणि त्याचे परिणाम समजणे आणि त्यासाठी आपण स्वतः जबाबदार असणे"***<br>*Mike Quinn, CEO* |
| आमची आचरण संहिता आणि आमच्या मूल्यांच्या अनुषंगाने नैतिक वर्तनाच्या सर्वोच्च मानकांचा आदर आणि प्रचार करण्यासाठी Doncasters वचनबद्ध आहे.<br>ही कंपनी मजबूत भ्रष्टाचार-विरोधी संस्कृती रुजवण्यासाठी वचनबद्ध आहे आणि सर्व लाचलुचपत-विरोधी आणि भ्रष्टाचार-विरोधी कायद्यांचे पालन करण्यास पूर्णपणे वचनबद्ध आहे आणि आमच्याकडून किंवा आमच्या वतीने काम करणाऱ्या कोणाकडूनही लाच किंवा इतर भ्रष्ट देयके, प्रलोभने किंवा तत्सम बाबी दिल्या जात नाहीत, देऊ केल्या जात नाहीत, वेगळे केले जात नाहीत किंवा प्राप्त केले जात नाहीत याची खात्री करते. |

| व्याख्या | |
|---|---|
| **लाचलुचपत** | लाचलुचपत म्हणजे स्वतःसाठी, दुसऱ्या व्यक्तीसाठी किंवा कंपनीसाठी अनुचित लाभ मिळवण्यासाठी कायदेशीर किंवा व्यावसायिक मार्गे, अनुचित वर्तनात गुंतण्यासाठी सार्वजनिक किंवा खाजगी क्षेत्रातील दुसऱ्या पक्षाला गुंतवून ठेवण्याची खात्री करून किंवा प्रवृत्त करून म्हणजे पैसे देणे, पैसे देऊ करणे, अधिकार देणे किंवा कोणतीही किमती गोष्ट किंवा पैसे देणे यांचे वचन असते. |
| | सार्वजनिक क्षेत्रातील लाचलुचपत, जिला सहसा "विदेशी सार्वजनिक अधिकाऱ्यांची लाचलुचपत" असे संबोधले जाते किंवा "सार्वजनिक लाचलुचपत" मध्ये सामील असतात:<br>▪ पैसे देणे, पैसे देऊ करणे, अधिकार देणे किंवा कोणतीही किमती गोष्ट किंवा पैसे देण्याचे वचन<br>▪ एखाद्या सरकारी अधिकाऱ्याला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला माहिती असेल की पैसे किंवा वचन विदेशी अधिकाऱ्याला दिले जाईल<br>▪ भ्रष्ट उद्देशाने<br>▪ (अ) त्या व्यक्तीच्या कोणत्याही कृतीवर प्रभाव टाकण्याच्या उद्देशाने (ब) त्यांच्या कायदेशीर कर्तव्याच्या उल्लंघनात एखादे काम करण्यास किंवा न करण्यास प्रवृत्त करण्यासाठी, (क) अनुचित लाभ मिळवण्यासाठी, किंवा (ड) एखाद्या निर्णयाची औपचारिक कृती बदलण्यासाठी त्या व्यक्तीला त्याचा प्रभाव वापरण्यासाठी प्रवृत्त करणे;<br>▪ कोणत्याही व्यक्तीसहकिंवा साठी व्यवसायाच्या आचरणात व्यवसाय किंवा फायदा मिळविण्यासाठी किंवा टिकवून ठेवण्यासाठी मदत करणे. |
| **कर्मचारी** | 'कर्मचारी' याचा अर्थ, कंपनीच्या सक्रिय पेरोलवरील अशी कोणतीही व्यक्ती, ज्यात व्यवस्थापक आणि कामगार सामील असतात, जे नियुक्तीवर, कंत्राटावर, तात्पुरते म्हणून, आंशिक काळ, शिकाऊ उमेदवार, प्रशिक्षणार्थी किंवा सल्लागार म्हणून काम करणारे असतात. |
| **यथायोग्य परिश्रम आणि जोखमी** | |

सर्व व्यवहारांमध्ये, अधिकाऱ्यांसोबत व्यवहारांमध्ये, आणि त्रयस्थ पक्षांच्या संदर्भात इतर व्यावसायिक बाबींमध्ये खालील समस्यांचा काळजीपूर्वक विचार केला पाहिजे:

1. प्रांतिक जोखमी, खास करून एखाद्या ठराविक देशातील लाचलुचपत आणि भ्रष्टाचाराचे प्रचलन
2. सीमापार पैसे देणे, खास करून वरील मुद्दा 1 च्या अंतर्गत असणारे प्रांत सामील असलेले
3. रोख पैशांसाठी विनंती, मध्यस्थी किंवा पैसे देण्याच्या अन्य कोणत्याही असामान्य मार्गे पैसे देणे
4. अशी कार्ये ज्यांच्यासाठी कंपनी आणि/किंवा इतरांकडून परवाने किंवा अन्य प्रकारचे अधिकृत अधिकारांची गरज असते
5. मालाचीआयात किंवा निर्यात सामील असलेले व्यवहार.

## लाचलुचपतीचे परिणाम

कंपनी आणि/किंवा कंपनीच्या आतील कर्मचारी लाचलुचपतीसाठी दोषी आढळू शकतात आणि त्यांना दंड किंवा कारावासाची शिक्षा होऊ शकते. सोबत, उच्च कायदेशीर खर्च आणि हानिकारक प्रसिद्धी संभवू शकते.

आम्ही लाचलुचपतीच्या आरोपांना अत्यंत गंभीरतेने घेऊ आणि या धोरणाचे पालन न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होईल.

## DONCASTERS लाचलुचपतीच्या बाबींशी कशी लढते?

### शीर्ष-पातळीची वचनबद्धता

Doncasters चे व्यवस्थापन सर्व लागू भ्रष्टाचार-विरोधी कायद्यांचे पालन करण्यास पूर्णपणे वचनबद्ध आहे आणि कोणत्याही वेळी कोणत्याही कारणास्तव लाच, लाचखोरी किंवा मदतीसाठी पैसे देत नाही.

ही वचनबद्धता सरकारी अधिकारी आणि गैर-सरकारी अधिकाऱ्यांसाठीलागू होते.

सर्व कर्मचारी, तृतीय पक्ष किंवा Doncasters चे प्रतिनिधित्व करणारी कोणतीही व्यक्ती किंवा संस्था या धोरणाचे नेहमी पालन करेल अशी आम्ही अपेक्षा करतो. Doncasters ला वस्तू आणि/किंवा सेवा प्रदान करताना तसेच Doncasters चे प्रतिनिधित्व करताना किंवा त्यांच्या वतीने कृती करताना कर्मचारी किंवा तृतीय पक्षाद्वारे केली गेलेली लाच आणि/किंवा भ्रष्टाचाराची कोणतीही कृत्ये सहन केली जाणार नाहीत.

लाचखोरी रोखण्यासाठी त्यांच्या वतीने काम करणाऱ्यांची निवड करणे आणि अशा कृत्यांवर देखरेख ठेवण्यासाठी योग्य काळजी घेणे ही Doncasters ची जबाबदारी आहे. तृतीय पक्षांचा वापर न्याय्य आणि दस्तऐवजीकरण केलेला असणे आवश्यक आहे आणि कंत्राट बहाल करण्याच्या आणि कोणत्याही आर्थिक वचनबद्धतेच्या पूर्वी तृतीय पक्षांची छाननी करणे आवश्यक आहे. तृतीय

| |
|---|
| पक्षांसोबत विद्यमान कराराच्या वाटाघाटी किंवा नूतनीकरण करताना, करारामध्ये कायदेशीर टीमने मंजूर केलेल्या लाचलुचपत-विरोधी आणि भ्रष्टाचारविरोधी तरतुदींचा समावेश आहे याची Doncasters च्या सर्व कर्मचाऱ्यांनी खात्री केली पाहिजे. |
| **पुस्तके आणि नोंदी/अंतर्गत नियंत्रणे** |
| Doncasters त्यांच्या आर्थिक नोंदी अचूकपणे आणि रास्तपणे असलेले त्यांचे व्यवहार आणि मालमत्तेचे स्वरूप प्रतिबिंबित करतात याची खात्री करण्यासाठी आवश्यक अंतर्गत नियंत्रणांची एक प्रणाली राखते; जी त्यांची संसाधने आणि मालमत्ता केवळ संचालक मंडळ आणि वरिष्ठ व्यवस्थापन यांच्या निर्देशांनुसार आणि अधिकृततेनुसार वापरली जातात; आणि ही नियंत्रणे रोखण्यासाठी/पर्यायी मार्ग काढण्यासाठी किंवा पायमल्ली करण्यासाठी तपासली आणि संतुलित केली जातात.<br><br>सर्व आर्थिक व्यवहारांची योग्यपणे आणि रास्तपणे नोंद करणे आवश्यक आहे. कोणतेही पैसे देण्याचे करार, इनव्हॉईस आणि पावती सोबत न्याय्य असणे आवश्यक आहे. इनव्हॉईसेस आणि पावत्या आर्थिक व्यवहाराचे खरे स्वरूप प्रतिबिंबित करणे आवश्यक आहे. सर्व पुस्तके आणि नोंदी हे संचालक मंडळ, लेखापरीक्षक, अंतर्गत लेखापरीक्षक आणि तसे करण्यास पात्र असलेल्या इतर कोणत्याही पक्षाद्वारे तपासणीसाठी खुले ठेवलेले असतील. योग्य करार, खरेदीची ऑर्डर, इनव्हॉईस किंवा पावती नसल्यास कोणतेही पैसे अदा केले जाऊ नये. |
| **अनुपालनासाठी जबाबदारी** |
| हे धोरण सर्व कर्मचाऱ्यांसाठी आणि इतर भागधारकांसाठी लागू आहे, आणि या धोरणाच्या अनुषंगाने लाचलुचपत रोखण्याची, शोधण्याची आणि कळवण्याची खात्री करणे प्रत्येकाची जबाबदारी आहे. |
| **रिपोर्टिंग मेकॅनिजम** |
| **व्यवस्थापनाला कळवणे** |
| कोणत्याही कर्मचाऱ्याला असे वाटले की त्यांनी या धोरणाचे उल्लंघन केले आहे किंवा करवले जात आहे, तर त्यांनी याला लाईन व्यवस्थापकांच्या ध्यानी आणून दिले पाहिजे. |
| **HRला कळविणे** |
| एखाद्या कर्मचाऱ्याला सध्या असलेल्या किंवा संभाव्य हितसंबंधांच्या संघर्षामुळे किंवा सूड उगविले जाण्याच्या भीतीमुळे त्याच्या लाईन व्यवस्थापकाकडे समस्या नेण्यास असुविधा वाटत असेल, तर ते त्यांच्या मानव संसाधनांच्या प्रतिनिधीला ही बाब कळवू शकतात. |
| **जनरल काउन्सेल आणि चीफ रिस्क ऑफिसरला कळवणे** |
| एखाद्या कर्मचाऱ्याला सध्या असलेल्या किंवा संभाव्य हितसंबंधांच्या संघर्षामुळे किंवा सूड उगविले जाण्याच्या भीतीमुळे त्याच्या लाईन व्यवस्थापकाकडे समस्या नेण्यास असुविधा वाटत असेल, तर ते जनरल काउन्सेल अँड चीफ रिस्क ऑफिसरलाहे प्रकरण कळवू शकतात. |

| |
|---|
| इतर भागधारक सुद्धा समस्या आणि चिंता थेट जनरल काउन्सेल आणि चीफ रिस्क ऑफिसरला कळवू शकतात, ज्यांच्याशी via hbarrett-hague@doncasters.com.द्वारा संपर्क केला जाऊ शकतो. |
| **Speak Up द्वारा कळवा** |
| कर्मचारी आणि इतर भागधारक या धोरणाची उल्लंघने Speak Up सेवेद्वारा पण कळवू शकतात.<br><br>Speak Up सेवा नॅवेक्स नावाच्या एका कंपनीद्वारा चालवली जाते आणि ती कळवण्यासाठीची एक बाह्य, स्वतंत्र सेवा आहे, जी स्थानिक नियमनांचे पालन करत असतानाच, याच्यासहित कायद्याच्या, आमच्या आचरण संहितेच्या, कॉर्पोरेट मूल्यांच्या आणि संबंधित धोरणांच्या किंवा निर्देशांच्या कोणत्याही उल्लंघनास कर्मचारी आणि इतरांना निनावीरीत्या कळविण्यासाठी रचलेले आहे.<br><br>संपर्क तपशील आमच्या आचरण संहितेवर, प्रत्येक साईटभोवती भित्तीपत्रकांवर, कर्मचाऱ्यांच्या ॲप आणि शेअरपॉइंटवर पाहिले जाऊ शकतात. |

| ऑनलाइन कळवा | फोनद्वारे कळवा |
| --- | --- |
| www.doncasters.ethicspoint.com | यूकेम धून:<br><br>कॉल: 0800 890 011<br><br>(सूचित केल्यावर, डायल करा: 833 537 0829)<br><br>यूएसए मधून:<br><br>कॉल: 833-537-0829<br><br>जर्मनी मधून:<br><br>कॉल: 0800 225 5288<br><br>(सूचित केल्यावर, डायल करा: 833 537 0829)<br><br>भारतामधून:<br><br>कॉल: 000 800 050 3406<br><br>मेक्सिकोमधून:<br><br>बाहेरील कॉल्ससाठी, तुमच्या स्थानिक ॲक्सेस कोडनंतर 800-288-2872 डायल करा.<br><br>कॉल संकलित करा– स्पॅनिश: 800-112-2020<br><br>(सूचित केल्यावर, डायल करा: 833 537 0829)<br><br>चीनमधून:<br><br>बाहेरील लाइनसाठी, आपल्या स्थानासाठीचा थेट संपर्क क्रमांक डायल करा:<br><br>चीन (दक्षिणेकडील): 10-811<br><br>चीन (उत्तरेकडील): 108-888<br><br>(सूचित केल्यावर, डायल करा: 833 537 0829) |